eee/—

महाराष्ट्र शासन

# प्रवेश नियामक प्राधिकरण

९ वा मजला, न्यु.एक्सेलसिअर
बिल्डींग, ए.के.नायमक मार्ग,
फोर्ट, मुंबई - ४०० ००१.

दुरध्वनी : ०२२ - २२०१ ६१५९
संकेतस्थळ : http://www.maha-ara.org
ईमेल : maharashtra.ara@gmail.com

क्रमांक : बैठक-१८२०/प्र.क्र. १८२/प्रनिप्रा/२५नोव्हे./इतिवृत्त/१०६८२-A/दिनांक : 3 DEC 2022

## बैठकीचे इतिवृत्त

**मा. श्री. जे.पी. डांगे (भा.प्र.से.), माजी मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य तथा अध्यक्ष, प्रवेश नियामक प्राधिकरण** यांच्या अध्यक्षतेखाली शुक्रवार, दिनांक २५ नोवहेंबर, २०२२ रोजी दुपारी ०३:०० वा. झालेल्या प्रवेश नियामक प्राधिकरणाच्या क्रमांक **६८व्या** बैठकीचे इतिवृत्त,-

प्राधिकरणाचे सदस्य श्री. रावसाहेब भागडे, (भा.प्र.से.) सदस्य सचिव तथा महासंचालक, महाराष्ट्र कृषिविषयक शिक्षण व संशोधन परिषद, पुणे (दूरदृष्य प्रणालीद्वारे) हे बैठकीस उपस्थित होते.

तसेच प्राधिकरणाचे सदस्य १) डॉ. विलास जी. गायकर, माजी कुलगुरु, डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ, लोणेरे, रायगड, २) प्रा.डॉ. दिलीप गोविंदराव म्हैसेकर, माजी कुलगुरु, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक तथा संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई, ३) डॉ. शैलेंद्र देवळणकर, संचालक, उच्च शिक्षण संचालनालय, म.रा., ४) डॉ. रविंद्र शिवाजी बंगाळ, कुलसचिव, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक, ५) डॉ. अभय वाघ, संचालक, तंत्र शिक्षण संचालनालय, मुंबई व ६) श्री. महेन्द्र ब. वारभुवन (भा.प्र.से.), सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण तथा आयुक्त, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, महाराष्ट्र राज्य हे बैठकीस गैरहजर असल्याने त्यांच्या अनुपस्थितीची नोंद घेण्यात आली.

सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण तथा आयुक्त, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, महाराष्ट्र राज्य हे अनुपस्थित असल्याने त्यांच्या वतीने डॉ. एम.बी. निकम, अवर सचिव, प्रवेश नियमाक प्राधिकरण तथा प्रशासकीय अधिकारी, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, मुंबई यांना सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण यांच्या वतीने बैठकीस उपस्थित राहण्याबाबत निर्देश दिले.

प्राधिकरणाच्या उक्त बैठकीचे इतिवृत्त पुढीलप्रमाणे आहे,-

### विषय क्रमांक १: प्रवेश नियामक प्राधिकरणाच्या दिनांक २८ ऑक्टोबर २०२२ रोजी झालेल्या बैठकीचे इतिवृत्त मान्यतेकरिता सादर.

प्रवेश नियामक प्राधिकरणाच्या दिनांक २८/१०/२०२२ रोजी झालेल्या बैठक क्रमांक ६७ चे इतिवृत्त कार्यालयामार्फत सर्व सदस्य व संबंधीत विभागांना प्राधिकरणाच्या दिनांक ११/११/२०२२ रोजीचे पत्र व ईमेलद्वारे अवगत करण्यात आलेले आहेत. त्यानुसार सदरील इतिवृत्त मान्य करण्यात आले.

(J. P. Dange)
Chairman
Admissions Regulating Authority,
Maharashtra State

**विषय क्रमांक २:** **प्राधिकरणाच्या दिनांक २८/१०/२०२२ रोजी झालेल्या बैठकीतील निर्णयानुसार कार्यवाही अहवाल (Action Taken Report) बैठकीपुढे ठेवणे.**

प्रवेश नियामक प्राधिकरणाच्या दिनांक २८/१०/२०२२ रोजी झालेल्या बैठकीच्या इतिवृत्तानुसार प्रवेश नियामक प्राधिकरण व राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष या दोन्ही विभागांकडून करण्यात आलेल्या कार्यवाहीचा अहवाल प्राधिकरणास सादर करण्यात आला व त्यानुसार सदरील अहवालास (प्रपत्र-अ) प्राधिकरणाची मान्यता प्रदान करण्यात आली.

तसेच उक्त नमूद अहवालातील विषय सूची क्र. १ नुसार प्राधिकरणाच्या दिनांक २८/०२/२०२२ ते २९/०७/२०२२ या कालावधीमध्ये झालेल्या बैठकीचे इतिवृत्त सर्व मा. सदस्य यांना प्राधिकरणाच्या दिनांक १/११/२०२२ व १८/११/२०२२ रोजीच्या पत्रान्वये कळविण्यात आले होते व तद्नुषंगाने सदरील इतिवृत्तांनुसार सुधारणा/बदल आवश्यक असल्यास प्राधिकरणास उलट टपाली कळविण्याबाबत सूचित करण्यात आले होते, या संदर्भात डॉ. आर. एस. बंगाळ, सदस्य तथा कुलसचिव, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक यांनी दिनांक २३/११/२०२२ रोजीच्या ईमेलद्वारे दिनांक २८/०२/२०२२ ते २९/०७/२०२२ या कालावधीमध्ये झालेल्या बैठकीचे इतिवृत्त (आरोग्य विज्ञान अभ्यासक्रमाशी संबंधीत) मान्य असल्याबाबत कळविले आहेत.

उक्त बाबी विचारात घेता दिनांक २८/०२/२०२२ ते २९/०७/२०२२ या कालावधीमध्ये झालेल्या सर्व बैठकींच्या इतिवृत्तांस व सदरील इतिवृत्तांनुसार करण्यात आलेल्या कार्यवाही अहवालास (प्रपत्र-ब) प्राधिकरणाची मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

**विषय क्रमांक ३:** **शैक्षणिक वर्ष २०२२-२३ मधील केंद्रीभूत प्रवेश प्रक्रिये दरम्यान प्राप्त झालेल्या तक्रांरीचा तपशील प्राधिकरणाच्या मान्यता व निर्णयाकरिता सादर.**

प्राधिकरणाच्या दिनांक २८/१०/२०२२ रोजीच्या बैठकीतील विषय सूची क्रमांक ३ मधील निर्देशान्वये शैक्षणिक वर्ष २०२२-२३ मधील केंद्रीभूत प्रवेश प्रक्रिये दरम्यान प्राप्त झालेल्या तक्रांरीचा विभागनिहाय तपशील प्राधिकरणास सादर केला, त्यानुसार सांगोपांग चर्चा करण्यात आली. या संदर्भात संबंधीत विभागाच्या परिक्षा समन्वयक यांनी तक्रारनिहाय केलेल्या कार्यवाहीचा तपशील प्राधिकरणास अवगत केला, प्राधिकरणाने केलेल्या कार्यवाहीची नोंद घेतली.

**विषय क्रमांक ४:** **मा. अध्यक्ष, प्रवेश नियामक प्राधिकरण, म.रा. यांच्या परवानगीने आयत्यावेळच्या विषयांवर चर्चा करणे व निर्णय घेणे.**

(क) **अधिनियम २०१५ मधील तरतूदींनुसार शैक्षणिक वर्ष २०२२-२३ करिता विविध व्यावसायिक अभ्यासक्रमास प्रवेशित विद्यार्थ्यांच्या प्रवेश मान्यते प्रकरणी प्राधिकरणाचे "प्रक्रिया शुल्क निश्चित करण्याबाबत.**

महाराष्ट्र विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था (प्रवेश व शुल्क यांचे विनियमन) अधिनियम, २०१५ मधील कलम १६(३) मधील तरतूदीन्वये प्राधिकरणाचे प्रक्रिया शुल्क वेळोवेळी निश्चित करण्यात आलेले आहे. शैक्षणिक वर्ष २०१५-१६ ते २०२०-२१ पर्यंत "प्रक्रिया शुल्क" निश्चितीच्या सुत्रामध्ये कोणताही बदल करण्यात आलेला नव्हता, तथापि शैक्षणिक वर्ष २०२१-२२ मध्ये सदरील सुत्रामध्ये बदल

(J. P. Dange)
Chairman
Admissions Regulating Authority,
Maharashtra State

करुन मा. प्रवेश नियामक प्राधिकरणाच्या दिनांक ३१/०१/२०२२ रोजीच्या बैठकीतील विषय सूची क्र. ६(अ) मधील निर्णयानुसार खालील प्रमाणे "प्रक्रिया शुल्क" आकारणी करण्यात आलेले आहे,-

अ) केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेच्या कोटयातील विद्यार्थी प्रवेश क्षमतेकरिता प्रति विद्यार्थी रु. १००/- परंतू रु. २०,०००/- पेक्षा कमी नसावे.

ब) अनिवासी भारतीय कोटा (NRI) विद्यार्थी प्रवेशाकरिता प्रति विद्यार्थी रु. ३०००/-

क) व्यवस्थापन कोटा (Management Quota) / संस्थास्तरीय कोटयातील (Institutional Quota) विद्यार्थी प्रवेश क्षमतेकरिता प्रति विद्यार्थी रु. २०००/-

सद्यस्थितीमध्ये राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षाद्वारे विविध व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या केंद्रीभूत प्रवेश प्रक्रिया पूर्ण होत असल्यामुळे प्राधिकरणाचे प्रक्रिया शुल्क लवकरात लवकर निश्चित करणे क्रमप्राप्त ठरते.

या अनुषंगाने मागील शैक्षणिक वर्षामध्ये प्राधिकरणाच्या दिनांक ३१/०१/२०२२ रोजीच्या बैठकीतील विषय सूची क्र. ६(अ) मधील निर्णयान्वये निश्चित करण्यात आलेल्या सुत्राप्रमाणे त्याच धर्तीवर शैक्षणिक वर्ष २०२२-२३ करिता राज्यातील व्यावसायिक अभ्यासक्रमांस प्रवेशित विद्यार्थ्यांच्या प्रवेश मान्यते प्रकरणी महाविद्यालयांकडून वसूल करण्यात येणाऱ्या प्राधिकरणाचे "प्रक्रिया शुल्क" निश्चितीबाबत खालील सुत्राप्रमाणे निश्चित करण्याचा निर्णय घेण्यात येत आहे,-

| **CAP Quota (Total Seats)** | **Over and above actual admissions of TFWS / EWS / PMSSS / J&K, etc.** | **Total (1+2)** | **Rs. 100 x No. of admissions shown in column No. (3), but not less than Rs. 20,000/-** | **No. Institutionl / Management Quota (Total Seats) x Rs. 2000/-** | **No. of Actual NRI admissions x Rs. 3000/-** | **Total Processing Fees (Column No. 4+5+6=7)** |
|---|---|---|---|---|---|---|
| (1) | (2) | (3) | (4) | (5) | (6) | (7) |
| | | | | | | |

वरील सुत्रानुसार प्राधिकरणाचे प्रक्रिया शुल्क आकारणीबाबत सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण, मुंबई यांनी उचित कार्यवाही त्वरीत करावी.

(ख) <u>प्रवेश नियामक प्राधिकरण कार्यालयातील अधिकारी / कर्मचारी यांच्या अतिरिक्त मानधनाबाबत.</u>

प्रवेश नियामक प्राधिकरण कार्यालयातील अधिकारी / कर्मचारी यांच्या अतिरिक्त मानधनाबाबत कार्यालयाने सादर केलेल्या दिनांक २२/११/२०२२ रोजीच्या प्रस्तावास प्राधिकरणाची मान्यता प्रदान करण्यात येत आहे. सदरील प्रस्तावामध्ये नमूद केल्यानुसार श्री. एस.आर. भोसले यांच्या अध्यक्षतेखाली नेमण्यात आलेल्या समितीने शिफारस केलेल्या व प्राधिकरणाने दिनांक २९/०६/२०२१ रोजीच्या बैठकीत निश्चित केलेल्या दरानुसार प्रवेश नियामक प्राधिकरण कार्यालयातील कार्यरत अधिकारी / कर्मचारी यांना मेहनताना व मोबदला अनुज्ञेय राहील.

(J. P. Dange)
Chairman
Admissions Regulating Authority,
Maharashtra State

(ग) **आर्थिक वर्ष २०१५-१६ ते २०२१-२२ चे लेखा परीक्षण अहवाल मा. प्रवेश नियामक प्राधिकरणाच्या मान्यतेस्तव सादर करण्याबाबत - वार्षिक अहवाल.**

प्रवेश नियामक प्राधिकरण व राज्य सामाईक प्रवेश परीक्षा यांचे आर्थिक वर्ष २०१५-१६ ते २०२१-२२ या कालावधीतील वार्षिक लेखे मान्यतेचा प्रस्ताव प्राधिकरणास सादर करण्यात आलेले आहेत. सदरील प्रस्तावास प्राधिकरणाची मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

महाराष्ट्र विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था (प्रवेश व शुल्क यांचे विनियमन) अधिनियम, २०१५ मधील कलम २(क), ९(१) व १०(२) नुसार सीईटी कक्षाचे संचालन व संनियंत्रण करणे, ही बाब प्रवेश नियामक प्राधिकरणाच्या कार्य, अधिकार व कार्यपध्दती मध्ये येते, तसेच प्रवेश नियामक प्राधिकरण व राज्य सामाईक प्रवेश कक्ष यांचे लेखे अधिनियमातील तरतूदींनुसार एकच असणे अपेक्षित आहे, ही बाब स्पष्ट करण्यात आली. त्यानुसार अधिनियम २०१५ (प्रकरण - पाच) कलम १७, १८ व १९ नुसार विहित केलेली कार्यपध्दती पूर्ण करण्याच्या अनुषंगाने दोन्ही विभागांच्या संबंधीतांनी उचित कार्यवाही सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण तथा आयुक्त, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष यांच्यामार्फत त्वरीत करावी.

(घ) **शैक्षणिक वर्ष २०२१-२२ मध्ये ज्या महाविद्यालयांनी प्रवेश मान्यतेचा प्रस्ताव प्राधिकरणास विलंबाने सादर केला अशा महाविद्यालयांच्या प्रवेश मान्यते प्रकरणी.**

महाराष्ट्र विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था (प्रवेश व शुल्क यांचे विनियमन) अधिनियम, २०१५ मधील कलम ९(५) च्या तरतुदींनुसार, शैक्षणिक वर्ष २०२१-२२ मधील व्यावसायिक पदवी व पदव्युत्तर पदवी आरोग्य विज्ञान अभ्यासक्रमासाठी प्रवेशित विद्यार्थ्यांच्या प्रवेशमान्यते संदर्भात ज्या महाविद्यालयांनी प्राधिकरणाच्या दिनांक १७/०२/२०२२ रोजीच्या परिपत्रकान्वये, प्राधिकरणाकडील प्रक्रिया शुल्काचा भरणा केल्याची पावती व संबंधीत संचालनालयाने तपासणी करुन प्रमाणित केलेला प्रवेश मान्यतेचा प्रस्ताव विलंबाने सादर केलेले आहेत, अशा महाविद्यालयांतील प्रवेशांमध्ये संबंधीत संचालकांच्या तपासणी अहवालानुसार ज्या प्रवेशांमध्ये त्रुटी नाहीत, अशा महाविद्यालयांतील विद्यार्थ्यांच्या प्रवेशास संचालनालयाच्या अहवालानुसार प्राधिकरणाची मान्यता प्रदान करण्यात येत आहे (प्रपत्र-क). तथापि, प्रस्तूत प्रकरणी महाविद्यालयांमार्फत अधिनियम २०१५ कलम ९(५)(दोन) च्या तरतूदींनुसार विहित कालावधीत प्रस्ताव सादर करण्यास झालेल्या दिरंगाईबाबत अधिनियम २०१५ मधील कलम २० नुसार रु. १ लाख दंड आकारण्याचा निर्णय सदरील बैठकीमध्ये घेण्यात आलेला आहे. (सदरील दंडाची रक्कम प्रवेशित विद्यार्थ्यांकडून वसूल करण्यात येऊ नये, या अटी/शर्तीवर). दंडाची रक्कम महाविद्यालयांना १५ दिवसांत प्राधिकरणास सादर करणे अनिवार्य राहील, याची नोंद घ्यावी. दंडाची रक्कम भरणा केल्यानंतर संबंधीत महाविद्यालयांना मान्यतापत्रे निर्गमित करण्यात येतील. सदरचा तपशील खालीलप्रमाणे,-

| Sr. No. | Name of the Directorate | Course Sr. No. | Name of the Course | For Approval of ARA Meeting 25-11-2022 | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | No. of colleges | Total admitted | Approved | Discripancies, hence not Approved | Admission Cancelled | Proposal yet not Submitted |
| (1) | (2) | (3) | (4) | (5) | (6) | (7) | (8) | (9) | (10) |
| 1 | Director Technical Education, Mumbai | 1 | B. Engineering / B.Tech | 9 | 1401 | 1387 | 9 | 5 | 15 |
| | | 2 | DSE (Direct Second Year Degree Engineering) | 9 | 985 | 973 | 12 | 0 | 15 |
| | | 3 | B. Pharmacy | 11 | 860 | 858 | 2 | 0 | 37 |

(J. P. Dange)
Chairman
Admissions Regulating Authority
Maharashtra State

9003/-

ARA/25th November 2022
Meeting No. 68

| Sr. No. | Name of the Directorate | Course Sr. No. | Name of the Course | For Approval of ARA Meeting 25-11-2022 | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | No. of colleges | Total admitted | Approved | Discripancies, hence not Approved | Admission Cancelled | Proposal yet not Submitted |
| (1) | (2) | (3) | (4) | (5) | (6) | (7) | (8) | (9) | (10) |
| | | 4 | DSP (Direct Second Year Degree Pharmacy) | 9 | 204 | 201 | 3 | 0 | 34 |
| | | 5 | MBA/MMS | 7 | 609 | 597 | 10 | 2 | 20 |
| | | 6 | MCA | 4 | 327 | 326 | 1 | 0 | 10 |
| | | 7 | B. Architecture | 2 | 48 | 48 | 0 | 0 | 3 |
| | | 8 | B. HMCT | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 1 |
| | | 9 | M. Engineering/ M.Tech | 5 | 43 | 41 | 1 | 1 | 7 |
| | | 10 | M. Pharmacy | 2 | 30 | 30 | 0 | 0 | 6 |
| | | 11 | M. Architecture | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| | | 12 | M. HMCT | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| | | 13 | Pharm. D. | 2 | 54 | 54 | 0 | 0 | 11 |
| | | 14 | Pharm. D. (Post Baccalaureate) | 1 | 8 | 8 | 0 | 0 | 2 |
| **TOTAL (A)** | | | | **61** | **4569** | **4523** | **38** | **8** | **161** |
| 2 | Director Higher Education, Pune | 1 | B.Ed. | 54 | 3927 | 3882 | 36 | 9 | 53 |
| | | 2 | M.Ed. | 8 | 243 | 241 | 2 | 0 | 11 |
| | | 3 | BA/BSc – B.Ed. (Integrated) | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 2 |
| | | 4 | B.Ed./M.Ed. (Integrated) | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| | | 5 | B.P.Ed. | 11 | 797 | 787 | 10 | 2 | 12 |
| | | 6 | M.P.Ed. | 4 | 103 | 100 | 3 | 0 | 5 |
| | | 7 | LLB 3 Yrs. | 15 | 1540 | 1534 | 6 | 0 | 45 |
| | | 8 | LLB 5 Yrs. (Integrated) | 17 | 1200 | 1192 | 8 | 0 | 42 |
| | | 9 | M.Ed. Special Education | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| **TOTAL(B)** | | | | **109** | **7810** | **7736** | **65** | **11** | **170** |
| 3 | MCAER | 1 | B.Sc. (Honours) (Agriculture) | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| | | 2 | B.Sc. (Honours) (Horticulture) | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| | | 3 | B. Tech. (Biotechnology) | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| | | 4 | B. Tech. (Food Technology) | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| | | 5 | B.Tech. (Agri. Engg.) | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| | | 6 | B.Tech. (Business Management) | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |

(J. P. Dange)
Chairman
Admissions Regulating Authority,
Maharashtra State

| Sr. No. | Name of the Directorate | Course Sr. No. | Name of the Course | For Approval of ARA Meeting 25-11-2022 | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | No. of colleges | Total admitted | Approved | Discripancies, hence not Approved | Admission Cancelled | Proposal yet not Submitted |
| (1) | (2) | (3) | (4) | (5) | (6) | (7) | (8) | (9) | (10) |
| | | 6 | B.Sc. (Honours) (Forestry) | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| | | 7 | B.Sc. (Honours) (Community Science) | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| | | 8 | B.F.Sc. (Fisheries) | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| **TOTAL(C)** | | | | **0** | **0** | **0** | **0** | **0** | 0 |
| 4 | Director Arts Education, Mumbai | 1 | BFA – Bachelor of Fine Arts | 1 | 95 | 94 | 0 | 1 | 0 |
| **TOTAL(D)** | | | | **1** | **95** | **94** | **0** | **1** | **0** |
| 5 | Director AYUSH, Mumbai | 1 | B.A.M.S. – Ayurved | 13 | 890 | 888 | 2 | 0 | 30 |
| | | 2 | B.H.M.S. – Homoeopathy | 16 | 1306 | 1264 | 42 | 0 | 11 |
| | | 3 | B.U.M.S. –Unani | 1 | 60 | 60 | 0 | 0 | 2 |
| | | 4 | PGA – Post Graduate Ayurved | 4 | 120 | 118 | 0 | 2 | 10 |
| | | 5 | PGH – Post Graduate Homoeopathy | 4 | 53 | 53 | 0 | 0 | 4 |
| | | 6 | PGU. – Post Graduate Unani | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| **TOTAL(E)** | | | | **38** | **2429** | **2383** | **44** | **2** | **57** |
| 6 | Director Medical Education, Mumbai | 1 | PGM - Post Graduate Medical | 1 | 102 | 102 | 0 | 0 | 3 |
| | | 2 | PGD – Post Graduate Dental | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| | | 3 | PGP – Post Graduate Physiotherapy | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 2 |
| | | 4 | M.B.B.S. – Medical | 1 | 170 | 170 | 0 | 0 | 1 |
| | | 5 | B.D.S. - Dental | 1 | 64 | 64 | 0 | 0 | 0 |
| | | 6 | B.P.Th. - Physiotherapy | 5 | 120 | 115 | 3 | 2 | 0 |
| | | 7 | B.Sc. Nursing | 6 | 251 | 245 | 2 | 4 | 0 |
| | | 8 | BOTH- Bachelor of Occupational Therapy | 1 | 6 | 6 | 0 | 0 | 0 |
| | | 9 | BASLP - Bachelor of Audiology and Speech Language Pathology | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 1 |
| | | 10 | BP&O - | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 1 |

(J. P. Dange)
Chairman
Admissions Regulating Authority,
Maharashtra State

| Sr. No. | Name of the Directorate | Course Sr. No. | Name of the Course | For Approval of ARA Meeting 25-11-2022 | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | No. of colleges | Total admitted | Approved | Discripancies, hence not Approved | Admission Cancelled | Proposal yet not Submitted |
| (1) | (2) | (3) | (4) | (5) | (6) | (7) | (8) | (9) | (10) |
| | | | Bachelor of Prosthetics & Orthotics | | | | | | |
| | | 11 | PGO - Post Graduate Occupational Therapy | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 1 |
| | | 12 | MASLP-master of audiology speech language pathology | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| | | 13 | MSc(P&O) - Master of Science in Prosthetics & Orthotics | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| | | 14 | M.Sc.Nursing | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| **Total (F)** | | | | **15** | **713** | **702** | **5** | **6** | **9** |
| **Grand Total** | | | | **224** | **15616** | **15438** | **152** | **28** | **397** |

(ङ) <u>शैक्षणिक वर्ष २०२१-२२ मधील व्यावसायिक पदव्युत्तर दंत अभ्यासक्रमास अनिवासी भारतीय कोटयांतर्गत व संस्था स्तरावरील प्रवेशित विद्यार्थ्यांच्या प्रवेश प्रकरणी गठित करण्यात आलेल्या उपसमितीने सादर केलेल्या दिनांक २१/११/२०२२ रोजीच्या अहवालास मान्यता प्रदान करण्याबाबत.</u>

शैक्षणिक वर्ष २०२१-२२ मधील व्यावसायिक पदव्युत्तर दंत अभ्यासक्रमास प्रवेशित अनिवासी भारतीय कोटा व अनिवासी भारतीय कोटयांतर्गत रिक्त असलेल्या जागांवर झालेल्या प्रवेशांची आवश्यक कागदपत्रे तपासणी करण्याकरिता प्राधिकरणाच्या दिनांक ३१/०१/२०२२ रोजीच्या बैठकीतील निर्णय बाब क्र. ४ मधील निर्णयानुसार १) कुलसचिव, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक व २) परिक्षा समन्वयक वैद्यकीय/आयुष, विभाग, सीईटी कक्ष यांची द्विसदस्यीय समिती गठित करण्यात आली होती व या संदर्भात उपसमितीने दिनांक २१/११/२०२२ रोजी अहवाल सादर केलेला आहे. सदरील अहवालानुसार ज्या प्रवेशांमध्ये त्रुटी नाहीत, अशा प्रवेशित विद्यार्थ्यांच्या प्रवेशास प्राधिकरणाची मान्यता प्रदान करण्यात येत आहे. (प्रपत्र-ड). महाविद्यालय-निहाय प्रवेशित विद्यार्थ्यांच्या प्रवेश मान्यतेची पत्रे निर्गमित करण्याबाबत प्राधिकरण कार्यालयाकडून उचित कार्यवाही त्वरीत करावी. १००८८-१००८७/-

(च) <u>बॉम्बे हॉस्पिटल नर्सिंग कॉलेज, मुंबई येथील शैक्षणिक वर्ष २०२१-२२ मधील प्रथम वर्ष व्यावसायिक पदवी नर्सिंग अभ्यासक्रमास प्रवेशित कु. वैष्णवी राजेंद्र म्हस्के यांच्या प्रवेश मान्यते प्रकरणी.</u>

शैक्षणिक वर्ष २०२१-२२ मधील प्रथम वर्ष व्यावसायिक पदवी नर्सिंग अभ्यासक्रमास प्रवेशित कु. वैष्णवी म्हस्के यांच्या प्रवेश प्रकरणी संचालनालय, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई यांनी दिनांक १९/०५/२०२२ रोजीच्या अहवालानुसार (College has admitted one candidate (AIR ५१६११० Maske Vaishnavi Ravindra) on State Quota. The issue date of EWS certificate is later date than

(J. R. Dange)
Chairman
Admissions Regulating Authority,
Maharashtra State

the cut-off-date than the cut-off-date of admission. Hence admission of these candidate is subject to approval of Hon'ble ARA. No discrepancy found in remaining selections.) सदरील प्रवेशास प्राधिकरणाची मान्यता प्रदान करण्यात आलेली नाही. प्राधिकरणाचा निर्णय संबंधीत महाविद्यालयास दिनांक २६/०९/२०२२ रोजीच्या पत्रान्वये कळविण्यात आलेला आहे.

या संदर्भात महाविद्यालयाने दिनांक १९/११/२०२२ रोजीच्या पुनर्विलोयाचिका अर्ज सादर केलेला असून प्रस्तूत प्रकरणी दिनांक २४/११/२०२२ रोजी मा. अध्यक्ष, प्रवेश नियामक प्राधिकरण यांच्या समोर सुनावणी झालेली आहे. सुनावणी दरम्यान दिलेल्या निर्देशास अनुसरुन महाविद्यालयाने आवश्यक कागदपत्रे दिनांक २४/११/२०२२ रोजीच्या पत्रान्वये प्राधिकरणास सादर केलेली आहेत. महाविद्यालयाने सादर केलेल्या माहिती/कागदपत्रांस अनुसरुन शैक्षणिक वर्ष २०२१-२२ मधील प्रथम वर्ष व्यावसायिक पदवी नर्सिंग अभ्यासक्रमास प्रवेशित कु. वैष्णवी म्हस्के यांच्या प्रवेशास प्राधिकरणाची मान्यता प्रदान करण्यात येत आहे. तथापि, प्रस्तूत प्रकरणी महाविद्यालयांमार्फत झालेल्या अनियमिततेबाबत अधिनियम २०१५ मधील कलम २० नुसार रु. १ लाख दड आकारण्याचा निर्णय घेण्यात आलेला आहे.(सदरील दंडाची रक्कम प्रवेशित विद्यार्थ्यांकडून वसूल करण्यात येऊ नये, या अटी/शर्तीवर). दंडाची रक्कम महाविद्यालयाने १५ दिवसांत प्राधिकरणास सादर करणे अनिवार्य राहील, याची नोंद घ्यावी.

(छ) <u>आरोग्य विज्ञान पदवी अभ्यासक्रमाच्या (नीटयुजी-२०२२) राज्य स्तरीय कोटा प्रवेश प्रक्रियेकरिता शासनाकडून प्राप्त माहिती पुस्तिकेबाबत.</u>

शैक्षणिक वर्ष २०२२-२३ मधील आरोग्य विज्ञान अभ्यासक्रमाच्या नीट-युजी-२०२२ अंतर्गत राज्य स्तरीय कोटा प्रवेश प्रक्रियेकरिता शासनाकडून माहिती पुस्तिका/नियमावली प्राप्त झालेली आहे. प्राधिकरणाने याबाबत नोंद घेतली. सदरील माहिती पुस्तिका प्राधिकरणाच्या सर्व मा. सदस्यांना अवगत करुन सर्व सदस्यांनी त्यांचे अभिप्राय सादर करण्याच्या अनुषंगाने कार्यवाही करण्याबाबत सीईटी कक्षाच्या संबंधीत विभागास निर्देश देण्यात आले.

(ज) <u>पीजीपी-सीईटी-२०२२ परीक्षाबाबत कु. अंकिता ओसवाल यांचेकडून प्राप्त तक्रार.</u>

शैक्षणिक वर्ष २०२२-२३ मधील व्यावसायिक पदव्युत्तर भौतिकोपचार अभ्यासक्रमाच्या पीजीपी-सीईटी-२०२२ संदर्भात कु. अंकिता ओसवाल यांच्याकडून प्राप्त झालेल्या तक्रारींच्या अनुषंगाने सीईटी कक्षा कडून सादर केलेल्या दिनांक १७/११/२०२२ रोजीच्या प्रस्तावाचे अवलोकन करण्यात आले. सदरील प्रस्तावानुसार कु. अंकिता ओसवाल यांनी सादर केलेल्या तक्रारीस अनुसरुन संबंधीत सेवापुरवठादार (अर्थात मे. एडूस पार्क) यांना नियमानुसार ताकिद तथा कार्यवाही करण्याबाबत आयुक्त व सक्षम प्राधिकारी, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष यांनी त्वरीत कार्यवाही करावी.

(झ) <u>शैक्षणिक वर्ष २०२३-२४ मधील केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेसाठी सुविधा केंद्राचे नियोजन करणेबाबत.</u>

व

(ञ) <u>शैक्षणिक वर्ष २०२३-२४ मधील केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेसाठी उच्च शिक्षण, कला शिक्षण, कृषी शिक्षण आणि वैद्यकीय शिक्षण या विभागांसाठी सुविधा केंद्र नियोजन करणेबाबत.</u>

शैक्षणिक वर्ष २०२३-२४ मधील विविध व्यावसायिक केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेसाठी सुविधा केंद्र (Facilitation Center[FC]) चे नियोजन करण्यासंदर्भात सीईटी कक्षाने सादर केलेल्या दिनांक १६/११/२०२२ व २१/११/२०२२ रोजीच्या प्रस्तावांचे अवलोकन करण्यात आले.

(J. P. Dange)
Chairman
...missions Regulating Authority,
Maharashtra State

सदरील प्रस्तावांनुसार शैक्षणिक वर्ष २०२३-२४ मधील सर्व व्यावसायिक केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेसाठी सुविधा केंद्राचे नियोजन करण्याकरिता प्राधिकरणाची मान्यता प्रदान करण्यात येत आहे, तथापि या बाबतचा सविस्तर अहवाल सीईटी कक्षाने प्राधिकरणास पुढील बैठकीमध्ये सादर करण्याचे निर्देश देण्यात आले.

(ट) डॉ. रेश्मा देसाई, विशेष कार्य अधिकारी, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, मुंबई यांच्या वेतन निश्चितीमध्ये अनियमितता झाल्याबाबत.

प्रस्तूत प्रकरणी सीईटी कक्षाकडून सादर केलेला दिनांक २१/११/२०२२ रोजीचा प्रस्ताव मान्य करण्यात आलेला आहे. त्यानुसार कार्यवाही करुन केलेला कार्यवाहीचा अहवाल आयुक्त, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, मुंबई यांनी प्राधिकरणास अवगत करावा.

(ठ) प्रवेश नियामक प्राधिकरणाच्या बैठकीमध्ये झालेल्या निर्णयानुसार सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण तथा आयुक्त व सक्षम प्राधिकारी, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, मुंबई यांनी बैठकीचे इतिवृत्त मंजूरीची वाट न पाहता बैठकीमध्ये झालेल्या ठरावानुसार यापुढे कार्यवाही त्वरीत करण्याबाबत निर्देश देण्यात आले. तसेच बैठकीचे इतिवृत्त निर्गमित झाल्यानंतर प्राधिकरणाच्या बैठकीमध्ये घेण्यात आलेल्या निर्णयानुसार प्रवेश नियामक प्राधिकरण व राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षातील सर्व संबंधीत विभागानी त्यांच्याशी संबंधीत प्रकरणी आवश्यक ती कार्यवाही करुन केलेल्या कार्यवाहीचा अहवाल सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण तथा आयुक्त व सक्षम प्राधिकारी, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, मुंबई यांच्यामार्फत प्राधिकरणास त्वरीत सादर करावा.

वरीलप्रमाणे विषयनिहाय सांगोपांग चर्चा झाली, बैठकीच्या सरतेशेवटी अवर सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण तथा प्रशासकीय अधिकारी, राज्य सामाईक प्रवेश परिक्षा कक्ष, मुंबई यांनी उपस्थितांचे आभार मानून सदर बैठक संपन्न झाल्याचे जाहीर केले.

(जे.पी. डांगे) भा.प्र.से.
अध्यक्ष,
प्रवेश नियामक प्राधिकरण तथा
माजी मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य.

दिनांक : ५/१२/२२